रे.मु.नं.६५/२००७
शेख बशीर वि. रमेशलाल व इतर

**<u>आदेश नि.क्र.१३३</u>**

अर्ज प्रतिवादीतर्फे नगरपालिका कर आकारणी उतारे, नोटीसची स्थळप्रत, पोस्टाचा पारत आलेला लिफाफा इ. दस्त दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे, कादपत्रे, वादपत्र व लेखी कैफियतचे अवलोकन केले.

३. अर्जदार प्रतिवादी करिता श्री जे.आर.कासलीवाल विधिज्ञ व सामनेवाला वादीकरिता श्री बी.आर.चौधरी विधिक्ष यांचा युक्तिवाद ऐकला.

४. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र.१ यास दुर्धर आजाराने ग्रासले आहे व दस्त गैरविल्हेस पडलेने यापुर्वी दाखल करता आले नाहीत. दस्त न्यायाचे कामी उपयुक्त व महत्वाचे आहेत, शेवटी दस्त दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती केली.

५. समोरील बाजुचे थोडक्यात कथन असे की, मुळ वादीचे हयातीत त्याचे सरतपासावेळी अथवा उलटतपासावेळी देखील सदर दस्त दाखल केले नाहीत. प्रतिवादीने गैरमार्गाने बनावट दस्त तयार करून त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न प्रतिवादी क्र.१ चा मुखत्यार करीत आहेत. जो कोणी प्रतिवादी सदर दस्त दाखल करत आहे व ज्याने दस्त मिळविले आहेत त्यानी न्यायालयात प्रतिज्ञापन द्यावे असा आदेश होणेची विनंतीसह दस्त दाखल करून न घेता चौकशी होउन कारवाईची विनंती केली.

६. अर्जदारातर्फे सार्वजनिक दस्त आहेत, गैरविल्हेस पडलेले होते. प्राप्त झालेने दाखल करत आहेत असा युक्तिवाद करण्यात आला. वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की, दस्त बनावट असल्याने संबंधितावर फौजदारी स्वरूपाची कारवाई होणेकरिता दस्त कोणी दाखल केले आहेत हे समोर येणे आवश्यक आहेत. त्याकरिता संबंधिताचे शपथपत्र घेणेत यावे म्हणून विनंती केली.

७.		दाखल होत असलेल्या कर आकारणी करामध्ये मालक म्हणून प्रतिवादी क्र.१ चे नाव आहे. सदर उतारे दाव्याच्या अंत्यंत महत्वपूर्ण मुद्‌दयाशी निगडीत असून त्यावर त्याचा परिणाम होणार असल्याने त्याबाबत थोडक्यात दावा व लेखी कैफियत काय आहे हे नमूद करणे आवश्यक आहे.

८.		वादीचे म्हणणेप्रमाणे त्यास रूपयांची गरज भासल्याने त्याने त्याचे मित्र प्रतिवादी क्र.१ चे वडील यांचेडून हातउसनवार पैसे घेतले व त्यास धर म्हणून प्रतिवादी क्र.१ चे हक्कात खरेदीखत करून दिले. ताबा प्रतिवादीदारांना नाही व रक्कम परत केल्यास व्यवहार उलटून दयावा असे ठरले होते. दरम्यानचे काळात रोचलदास यांनी खरेदीखताचा अंमल करायचा नाही म्हणजेच खरेदीखता आधारे मिळकतीला नाव लावायचे नाही असे ठरले होते.

९.		वादीचे पुढे कथन असे की, सन १९७५ पासून ते ऑगस्ट २००७ पर्यंत रोचलदास यांनी कोणत्याही नोंदी केल्या नाहीत व खरेदीखता द्‌वारे अंमल झाला नाही. परंतु २७.०८.२००७ रोजी प्रतिवादीने मालकी सदरी नाव लावून घेतले. सदर बाब वादीस ३०.०८.२००७ रोजी समजली व त्याआधारे वादीने खरेदीखत बंधनकारक नाही व रद्‌द करून मिळावे म्हणून विनंती केलेली आहे.

१०.		प्रतिवादीतर्फे सन १९७५ च्या व्यवहाराआधारे सन २००७ पावेतो रोचलदासचे नाव लागले नाही व अंमल झाला नाही ही बाब नाकारलेली नाही. म्हणजेच सदर बाब मान्य केलेली आहे. याउपर प्रतिवादी क्र.१ त्याचे कैफियतमध्ये कलम ९ मध्ये खरेदीखताआधारे स्वत:चे नाव लावून घेतले नाही असे गृहीत धरले तरी ७/१२ उतारा हा कुठल्याही प्रकारची मालकी शाबीत करू शकत नाही असे कथन केले आहे. तसेच कलम १४ मध्ये दि.२७.०८.२००७ ला प्रतिवादी क्र.१ चे नाव लागलेले नमूद केले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादमिळकतीचे उता—याला सन

१९७९ ते ८५ चे काळात प्रतिवादी क्र.१ चे नाव असण्याचा प्रश्न येत नाही. अशा परिस्थितीमध्ये सदर दाखल होत असलेले दस्त बनावट आहेत असे वादीने म्हणणे नैसर्गिक आहे.

११. दावा मुदतीत आहे का व प्रत्यक्षात खरेच खरेदीविक्री झाली आहे का या बाबी पाहतेवेळी प्रतिवादी क्र.१ चे वादमिळकतीला नाव केव्हा लागले याचा निष्कर्ष महत्वाचा आहे. याशिवाय २००७ पर्यंत नाव लागले नव्हते असे कथन करून त्यापुर्वीच्या नोंदी कुठल्याही समाधानकारक स्पष्टीकरणाशिवाय दाखल करणे हे प्रतिवादीच्या कथनाशी विसंगत आहे. दस्त हे नांदगाव नगरपालिकाचे कर आकारणी उतारे आहेत, त्यावर संबंधित विभागाच्या मुख्याधिकारी कर्मचारी यांचे शिक्के व कथित सहया आहेत. त्यामुळे ते दाखल करून घेणे आवश्यक आहेत.

१२. प्रतिवादी सदर दस्ताची सत्यता समोर आणू शकतो व वादी सदर दस्त सत्य नसल्याबाबत पुरावा सादर करून त्याची सत्यता खोडून काढू शकतात. दस्त जेष्ठ विधिज्ञ श्री जे.आर.कासलीवाल यांनी दाखल केलेले आहेत त्यामुळे ते ज्या ज्या प्रतिवादी करिता विधिज्ञ म्हणून आहेत त्या सर्वांच्या वतीने व त्या सर्वांसाठी ते दाखल केले जात आहेत असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे वादी त्या सर्व प्रतिवादी विरोधात योग्य ती कारवाई करू शकतो. सदर दस्त कोणी, कसे व कधी प्राप्त केले आणि ते कोठे होते याबाबत अर्जात कथन नसणे व सदर दस्ताबाबत कैफियत मध्ये उल्लेख नसणे हया बाबी दस्ताची सत्यता विचारात घेते वेळी विचारात घेतल्या जावू शकतात. यापुर्वी कथन केल्याप्रमाणे दस्त दाखल करून घेणे आवश्यक आहे, करिता खालील आदेश:

**<u>आदेश</u>**

दस्त स्वीकारण्यात येतात.

दि. २९/०१/२०२०

Sharad Ginyandev Dubale

Digitally signed by Sharad Ginyandev Dubale
Date: 2020.01.30 12:16:15 +0530